# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 12 April 2025

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १२ एप्रिल २०२५ सकाळी ७.१० मि.

****

- रेल्वेच्या "अमृत" योजनेत महाराष्ट्रातल्या १३२ रेल्वे स्थानकांचा समावेश–छत्रपती शिवरायांशी संबंधित स्थळदर्शन रेल्वे सर्किटची घोषणा
- केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज रायगड आणि मुंबई दौऱ्यावर
- एसटी कर्मचाऱ्यांचा पगार यापुढे दरमहा सात तारखेला–प्रताप सरनाईक यांचं आश्वासन
- प्रसिद्ध उद्योजक मधुर बजाज यांचं निधन

आणि

- हनुमान जन्मोत्सव सर्वत्र भक्तिभावाने साजरा

****

''अमृत भारत स्टेशन" योजनेंतर्गत महाराष्ट्रात एकूण १३२ रेल्वे स्थानकांचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेद्वारे देशभरातील महत्त्वाच्या रेल्वे स्थानकांचे आधुनिकीकरण करण्यात येणार असून प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, अशी माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. ते काल मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. या योजनेत मराठवाड्यातल्या छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, लातूर, परभणी आणि हिंगोली डेक्कनसह हिमायतनगर, किनवट, भोकर, धर्माबाद, मुखेड, उमरी, गंगाखेड, मानवत, परतूर, पूर्णा, आणि सेलू या स्थानकांचा समावेश आहे.

महाराष्ट्रात सतरा हजार कोटी रुपयांहूनअधिक गुंतवणुकीच्या विविध प्रकल्पातून रेल्वे सेवेचं जाळं अधिक विकसित होत असल्याचं प्रतिपादन, अश्विनी वैष्णव यांनी केलं. या सर्व प्रकल्पांचा त्यांनी यावेळी आढावा घेतला..

**बाईट – रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव**

पावसाळ्यात रेल्वे सेवा बाधित होऊ नये, यासाठी रेल्वेच्या अभियंत्यांनी दोन वर्षांच्या संशोधनातून एक यंत्रणा विकसित केल्याची माहिती रेल्वेमंत्र्यांनी यावेळी दिली. या संदर्भात रेल्वेला पेटंटही मिळणार असल्याचं त्यांनी सांगितलं.
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी उपस्थित होते. छत्रपती शिवरायांशी संबंधित ऐतिहासिक स्थळदर्शन असणारं रेल्वे सर्किट लवकरच राज्यात सुरु होईल, अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. ते म्हणाले..

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

मुंबईत पुढच्या महिन्यात होणाऱ्या वेव्ज परिषदेच्या अनुषंगाने माहिती आणि प्रसारणमंत्री वैष्णव यांनी आढावा घेतला. मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी बोलतांना, हा कार्यक्रम दरवर्षी आयोजित करण्याची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची इच्छा असून तो मुंबईतच होईल, अशी ग्वाही दिली.
दरम्यान, मुंबईत गोरेगाव इथे इंडियन इन्स्टिटयूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी–आयआयसीटी उभारण्यात येणार आहे, मुख्यमंत्री फडणवीस यांनी काल मुंबईत ही माहिती दिली.

****

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा दोन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर आले आहेत. आज सकाळी रायगड जिल्ह्यात पाचाड इथं राजमाता जिजाऊ यांच्या, तर रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीचं दर्शन घेऊन, तिथल्या कार्यक्रमात गृहमंत्री सहभागी होतील. आज संध्याकाळी मुंबईत गुजराती साप्ताहिक पत्रिका चित्रलेखाच्या ७५व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाला शहा उपस्थित राहणार आहेत.

****

राज्य परिवहन महामंडळ कर्मचाऱ्यांचा पगार दर महिन्याच्या सात तारखेला होईल, असं आश्वासन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिलं आहे. ते काल एसटी मुख्यालयात महामंडळाच्या अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर बोलत होते. राज्यातल्या बस स्थानकांचा खाजगी विकासकांच्या माध्यमातून बांधा–वापरा आणि हस्तांतरीत करा या तत्त्वावर विकास करण्यात येणार

असून त्यापैकी पहिल्या टप्प्यातील ६६ जागांची निविदा प्रक्रिया लवकरच सुरू होणार असल्याचं सरनाईक यांनी सांगितलं.

****

प्रसिद्ध उद्योजक मधुर बजाज यांचं काल पहाटे मुंबईत निधन झालं. ते ७३ वर्षांचे होते. हृदय विकाराचा झटका आल्यामुळे गेल्या दोन दिवसांपासून त्यांच्यावर ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार सुरु होते. बजाज ऑटो या दुचाकी वाहन उद्योग समुहाचे ते मानद संचालक तसंच महाराष्ट्र स्कूटर लिमिटेडचे अध्यक्ष होते. बजाज यांच्या निधनाबद्दल छत्रपती संभाजीनगर इथं उद्योग क्षेत्रातून शोक व्यक्त होत आहे. चेम्बर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज ॲण्ड ॲग्रीकल्चर-सीएमआयएचे विद्यमान अध्यक्ष अर्पित सावे यांनी मधूर बजाज यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

****

जलसंपदा विभागामार्फत १५ ते ३० एप्रिल दरम्यान `जल व्यवस्थापन कृती पंधरवडा` साजरा केला जाणार आहे. या पंधरवड्याच्या आयोजनासंदर्भात जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली काल मंत्रालयात बैठक झाली. या पंधरवड्याच्या माध्यमातून जलसाक्षरतेसाठी विविध उपक्रम राबवून जल व्यवस्थापनावर अधिक भर द्यावा, असं आवाहन विखे पाटील यांनी केलं. या बैठकीला जलसंपदा तसंच आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांच्यासह अनेक अधिकारी उपस्थित होते.

****

हनुमान जन्मोत्सव आज साजरा झाला. आज पहाटे सूर्योदयाच्या वेळी ठिकठिकाणच्या हनुमान मंदिरांमध्ये हनुमान जन्मसोहळा झाला, भाविकांची यावेळी मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या निमित्तानं सर्वच मंदिरांमध्ये विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

विश्व हिंदू परिषद तसंच बजरंग दलाच्या वतीने छत्रपती संभाजीनगर इथं बीड बायपास परिसरातल्या त्रिदेवता मंदिरात आज सायंकाळी महाआरती करण्यात येणार आहे. शहरातील विविध हनुमान मंदिरात आरती, प्रसाद, हनुमान चालिसा पठण, महाप्रसादाचं आयोजन करण्यात आलं आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या खुलताबाद इथं भद्रा मारूतीच्या दर्शनासाठी भाविकांच्या होणाऱ्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर, दौलताबाद घाट रस्ता आज रात्री दहा वाजेपर्यंत जड वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार आहे.

****

थोर समाजसुधारक, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त काल त्यांना विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून अभिवादन करण्यात आलं. छत्रपती संभाजीनगर शहरातल्या औरंगपुरा भागातील महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याला विविध संघटनांच्या वतीनं पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं. संत सावता महाराज विद्यार्थी वसतिगृहात इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. बीड इथल्या शासकीय निरीक्षणगृहातही महात्मा फुले यांना अभिवादन करण्यात आलं.

धाराशिव इथं फुले शाहू आंबेडकर उद्यान कृती समितीच्या वतीनं विविध शासकीय योजनांची माहिती देणारं चित्र प्रदर्शन भरवण्यात आलं. जिल्हाधिकारी कीर्ती किरण पूजार यांच्या हस्ते या प्रदर्शनाचं उद्घाटन झालं. त्यांनी याबाबत अधिक माहिती दिली..

**बाईट – जिल्हाधिकारी कीर्ती किरण पूजार**

****

छत्रपती संभाजीनगर इथं डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात ७ ते १४ एप्रिल दरम्यान भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव साजरा होत आहे. यानिमित्त विद्यापीठात इतिहास वस्तू संग्रहालयाच्या प्रांगणात ग्रंथ महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. पालक मंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते काल या महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आलं. विद्यापीठातील वसतीगृहासाठी २५ कोटी रूपयांचा निधी सामाजिक न्याय विभागातर्फे देण्यात येईल, अशी ग्वाही शिरसाट यांनी दिली.

****

लातूर जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागांच्यावतीनं काल महात्मा फुले यांच्या सामाजिक कार्याची माहिती देण्यात आली. ग्रामीण आणि शहरी भागांत पथनाट्यं आणि लघुनाटिकांद्वारे सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांविषयी जनजागृती करण्यात आली.

****

धाराशिव इथं काल डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार मंचाच्या व्याख्यानमालेचा काल समारोप झाला. 'भारतीय संविधानाची ७५ वर्ष–वाटचाल, सद्यस्थिती आणि भवितव्य' या विषयावर मुंबई उच्च न्यायालयातील विधीज्ञ, संविधान अभ्यासक जयमंगल धनराज यांनी आपले विचार मांडले.

****

परभणी महावितरण मंडळ कार्यालयात छतावरच्या सौरऊर्जा प्रकल्पाचं काल पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते लोकर्पण झालं. जिल्ह्यातील प्रत्येक कार्यालय तसंच घरकुल योजनेद्वारे हा प्रकल्प प्रस्तावित करुन हरित ऊर्जा निर्मिती केली जाणार असल्याचं बोर्डीकर यांनी सांगितलं.

****

छत्रपती संभाजीनगर इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मैदानावर राज्य ९ साईड सब ज्युनिअर, ज्युनिअर मुले मुली अजिंक्यपद फुटबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. या स्पर्धा आज आणि उद्या होणार आहेत.

****

अर्जेंटीना इथे सुरु असलेल्या तिरंदाजी विश्वचषक २०२५ स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यात भारतानं पदकतालिकेत दुसरं स्थान पटकावलं आहे. भारतानं ४ सुवर्ण, २ रौप्य आणि २ कांस्य अशी एकूण ८ पदकं जिंकली. स्पर्धेच्या कालच्या शेवटच्या दिवशी सौरभ चौधरी आणि सुरुचि सिंह या जोडीनं भारताच्याच मनु भाकर आणि रविंदर सिंह या जोडीला १६–८ अशा फरकाने हरवत कांस्यपदक जिंकलं. या स्पर्धेचा दुसरा टप्पा उद्या पेरु इथे सुरु होणार आहे.

****